# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मा. आयुक्त महोदय यांचे आदेशानुसार स्लम व आरोग्य विभागातील
**{स्लम विभाग}** अधिकारी/कर्मचाऱ्यांद्वारा प्रभाग क्र.८ अंतर्गत मोतीबाग ROB जवळील बोरियापुरा येथील सुलभ शौचालय तोडुन महाराष्ट्र रेल इनफ्रास्टक्चर डेव्हलमेंट कॉर्पोरेशन लि. द्वारा नव्याने सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित कामाची पाहणी केली असता, त्या जागी अस्तीत्वात असलेल्या सार्वजनिक शौचालयामुळे महारेल यांचे उड्डानपुलाचे कामाकरिता पिल्लर क्रमांक २३ व २४ चे बांधकाम थांबल्याचे निदर्शनास येते.

तसेच गांधीबाग झोन क्र.६ चे अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या मौका चौकशीनुसार त्या परिसरातील घरोघरी जावून चौकशी केली असता, तेथील प्रत्येक घरात शौचालय असून, स्थानिक रहिवाशांना सदर्हू सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता नसून, त्या परिसरात आवाजाही करणाऱ्या नागरीकांनाच फक्त या सार्वजनिक शौचालयाचा उपयोग होतो. तसेच सदर शौचालयामुळे स्थानिक महिलांना असामाजिक तत्वांचा त्रास होत असून, त्या परिसरात पर्यायी ठिकाणी शौचालय निर्माण करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी विरोध दर्शविलेला आहे. यावरून सहा. आयुक्त, गांधीबाग, झोन क्र.६ यांनी सदर ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता नसल्याचे अभिप्राय देवून, शौचालय तोडण्याबाबत वरिष्ठांनी निर्णय घेण्याची शिफारस केलेली आहे.

सार्वजनिक शौचालय तोडल्यास परिसरात आवाजाही करणाऱ्या/बाजारपेठेत येणाऱ्या नागरीकांची असुविधा होवु नये याकरिता तात्पुरत्या स्वरूपात शौचालयाची व्यवस्था करणे तसेच पिल्लर क्रमांक २३ व २४ चे तसेच उड्डानपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर MRIDC यांनी नस्ती मध्ये टाचण नकाशानुसार त्याच ठिकाणी नव्याने शौचालयाचे बांधकाम करणेच्या अटीवर अस्तीत्वात असलेले प्रभाग क्र.८ अंतर्गत मोतीबाग ROB जवळील बोरियापुरा येथील सार्वजनिक शौचालय तोडण्यास हरकत वाटत नाही.

मान्यतेस सादर.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 383/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 23/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता तथा सक्षम प्राधीकारी (स्लम), स्लम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मा. आयुक्त महोदय यांचे आदेशानुसार स्लम व आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांद्वारा प्रभाग क्र.८ अंतर्गत मोतीबाग ROB जवळील बोरियापुरा येथील सुलभ शौचालय तोडुन महाराष्ट्र रेल इनफ्रास्टक्चर डेव्हलमेंट कॉर्पोरेशन लि. द्वारा नव्याने सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित कामाची पाहणी केली असता, त्या जागी अस्तीत्वात असलेल्या सार्वजनिक शौचालयामुळे महारेल यांचे उड्डानपुलाचे कामाकरिता पिल्लर क्रमांक २३ व २४ चे बांधकाम थांबल्याचे निदर्शनास येते.

तसेच गांधीबाग झोन क्र.६ चे अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या मौका चौकशीनुसार त्या परिसरातील घरोघरी जावून चौकशी केली असता, तेथील प्रत्येक घरात शौचालय असून, स्थानिक रहिवाशांना सदर्हू सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता नसून, त्या परिसरात आवाजाही करणाऱ्या नागरीकांनाच फक्त

या सार्वजनिक शौचालयाचा उपयोग होतो. तसेच सदर शौचालयामुळे स्थानिक महिलांना असामाजिक तत्वांचा त्रास होत असून, त्या परिसरात पर्यायी ठिकाणी शौचालय निर्माण करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी विरोध दर्शविलेला आहे. यावरून सहा. आयुक्त, गांधीबाग, झोन क्र.६ यांनी सदर ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता नसल्याचे अभिप्राय देवून, शौचालय तोडण्याबाबत वरिष्ठांनी निर्णय घेण्याची शिफारस केलेली आहे.

सार्वजनिक शौचालय तोडल्यास परिसरात आवाजाही करणाऱ्या/बाजारपेठेत येणाऱ्या नागरीकांची असुविधा होवु नये याकरिता तात्पुरत्या स्वरूपात शौचालयाची व्यवस्था करणे तसेच पिल्लर क्रमांक २३ व २४ चे तसेच उड्डानपुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर MRIDC यांनी नस्ती मध्ये टाचण नकाशानुसार त्याच ठिकाणी नव्याने शौचालयाचे बांधकाम करणेच्या अटीवर अस्तीत्वात असलेले प्रभाग क्र.८ अंतर्गत मोतीबाग ROB जवळील बोरियापुरा येथील सार्वजनिक शौचालय तोडण्यास हरकत वाटत नाही.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**